# श्री क्षेत्र अष्टविनायक विकास आराखडा



























## माहिती




शासनाच्या निर्देशानुसार अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचे काम पुरातत्त्व खात्यामार्फत करण्यात येणार आहे. सदर विकास आराखड्यांतर्गत मा. विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८ ऑगस्ट 2025 रोजी कार्यकारी समितीची बैठक संपन्न झाली. सद्यस्थितीत मा. विभागीय आयुक्त यांनी खालीलप्रमाणे सहा गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.



# मयुरेश्वर मंदिर, मोरगाव

ता. बारामती, जि. पुणे

**स्थानमहात्म्य:**

गाणपत्य संप्रदायाचे महत्त्वाचे स्थान असलेला हे अष्टविनायक स्थान. संत रामदासांना “सुखकर्ता दुख:हर्ता” ही गणेश आरती इथे स्फुरली असे मानले जाते.

**कामांचे स्वरूप:**

वर्षानुवर्षे केलेली अनियोजित व विसंगत कामे काढून मूळ वास्तुरचनेचे जतन व संवर्धन तसेच आवश्यक त्या ठिकाणी वास्तुरचनेला सुयोग्य अशा पद्धतीच्या भक्तांना आवश्यक सोयीसुविधा देणे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. ८.५७ कोटी



# चिंतामणी गणपती, थेऊर

ता. हवेली, जि. पुणे

**स्थानमहात्म्य:**

गाणपत्य संप्रदायाचे महत्त्वाचे स्थान असलेला हा दुसरा अष्टविनायक स्थान. नितांत श्रद्धा असल्याने माधवराव पेशव्यांनी आपल्या अखेरच्या घटका ही इथेच मोजल्या. हरिपंत फडके व इतर मातब्बरांनी नंतर काही सुधारणा केल्याचे दाखले आहेत.

**कामांचे स्वरूप:**

वर्षानुवर्षे केलेली अनियोजित व विसंगत कामे काढून मूळ वास्तुरचनेचे जसे की सभामंडपाचे छत, ओवऱ्या ह्यांचे जतन व संवर्धन तसेच व भक्तांना आवश्यक अशा पद्धतीच्या सोयीसुविधा देणे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. ४.७८ कोटी



# विघ्नेश्वर मंदिर, ओझर

ता. जुन्नर, जि. पुणे

**स्थानमहात्म्य:**

अठराव्या शतकात चिमाजीअप्पांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला व विसाव्या शतकात नवीन सभामंडपाची उभारणी केली गेली

**कामांचे स्वरूप:**

वर्षानुवर्षे केलेली अनियोजित व विसंगत कामे काढून मूळ वास्तुरचनेचे जसे की जतन व संवर्धन, तटबंदीची डागडुजी तसेच त्या ठिकाणी वास्तुरचनेला सुयोग्य अशा पद्धतीच्या भक्तांना आवश्यक सोयीसुविधा देणे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. ४.४५ कोटी



# महागणपती, रांजणगाव

ता. शिरूर, जि. पुणे

**स्थानमहात्म्य:**

अठराव्या शतकात माधवराव पेशव्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. तसेच, इंदोरच्या किबे सरदारांनी लाकडी सभामंडपाची उभारणी केली.

**कामांचे स्वरूप:**

वर्षानुवर्षे केलेली अनियोजित व विसंगत कामे काढून मूळ वास्तुरचनेचे, मंदिर, ओवऱ्या, बारवेचे जतन व संवर्धन, तटबंदीची डागडुजी तसेच त्या ठिकाणी वास्तुरचनेला सुयोग्य अशा पद्धतीने भक्तांना आवश्यक सोयीसुविधा देणे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. ८.७० कोटी



# वरदविनायक , महड

ता. खालापूर, जि. रायगड

**स्थानमहात्म्य:**

मूळ मंदिर लाकूड-वीट-चुन्याचे बांधकाम असलेल्या मठ किंवा वाड्यामध्ये होते. १९९० च्या दशकात दगडी बांधकामातील गर्भगृह अबाधित ठेऊन इतर बांधकाम पाडून त्या जागी RCC हॉल बांधला गेला.

**कामांचे स्वरूप:**

RCC बांधकाम काढून मंदिराच्या प्रतिभेला सुसंगत असे लाकूड व दगडी बांधकाम प्रस्तावित आहे. वास्तुरचनेला सुयोग्य अशा पद्धतीने भक्तांना आवश्यक सोयीसुविधांचा ही त्यात समावेश आहे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. १५.१२ कोटी

# सिद्धिविनायक , सिद्धटेक

ता. दौंड, जि. अहिल्यानगर



**स्थानमहात्म्य:**


१८ व्या शतकात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ह्यांनी सध्याच्या मंदिराचे मंदिर बांधले. सभामंडपाची बांधणी सरदार मैराळ ह्यांनी केली; विसाव्या शतकात तीत ही सुधारणा केल्या गेल्या.

**कामांचे स्वरूप:**

वर्षानुवर्षे केलेली अनियोजित व विसंगत कामे काढून मूळ वास्तुरचनेचे जतन व संवर्धन, सभामंडपाची पुन:बांधणी तसेच त्या ठिकाणी वास्तुरचनेला सुयोग्य अशा पद्धतीने  भक्तांना आवश्यक सोयीसुविधा देणे.

**प्रशासकीय मान्यता:**

रु. ९.४७ कोटी



धन्यवाद